# २३. मूल्यशिक्षण अभियान

मूल्य शिक्षणाबाबत आजपर्यंत बराच ऊहापोह झाला. अभ्यासक्रमातून मूल्य अभिव्यक्त होतात. शिक्षण हे मूल्याधिष्ठित असावे. नव्हे ते असतेच. १९९७ पासून मूल्यशिक्षणही अनिवार्य करण्यात आले होते. पण २००६ पासून त्यात भर घालून 'व्यक्तिमत्त्व विकासा'चा अंतर्भाव करण्यात आला. वास्तविक पाहता मूल्यशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास हे घटक तात्त्विक भागातून शिकविण्याचे घटक नाहीत. त्याचा सराव हा महत्त्वाचा आहे. ह्या बाबी औपचारिक व अनौपचारिक घटकातून विकसित होणाऱ्या आहेत. शिवाय मूल्य विकसनासाठी सर्वच घटकांनी प्रयत्नशील राहायला हवे.प्रत्येक स्तरावर आता मूल्य शिक्षणाचा विचार होणे आवश्यक आहे. मूल्य शिक्षणाचा विचार पालकांनी, शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी तसेच शासनाने कसा करायला हवा ह्याबाबत माझ्या काही उपाययोजनांचा ऊहापोह मी ह्या ठिकाणी केला आहे.

**शिक्षकांनी करावयाचे उपाय :**

(१) मूल्य शिक्षणातील परिपाठाबाबत योग्य नियोजन अशा प्रकारे असावे, की तोचतोपणाचा दोष त्यातून टाळता यावा.

(२) विद्यार्थ्यांची या परिपाठात अभिरुची वाढावी म्हणून शिक्षकांनी नावीन्यपूर्णता आणावी व शिक्षक हे कार्य करीत आहेत अथवा नाही हे मुख्याध्यापकांनी पाहावे.

(३) प्रत्येक शाळेच्या शिक्षकांनी आपल्या परिसराचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन मासिक मूल्यशिक्षण परिपाठाचे नियोजन करावे.

(४) परिपाठात सर्व शिक्षकांचा सहभाग घ्यावा.

(५) सर्व शिक्षकांना हस्तपुस्तिका उपलब्ध करून द्याव्यात.

(६) मूल्यशिक्षणाच्या संदर्भात जेवढे संदर्भग्रंथ आहेत, ते शाळेच्या ग्रंथालयात उपलब्ध करून द्यावे.

(७) मूल्यशिक्षणाबाबत केवळ तात्त्विक ज्ञान महत्त्वाचे नाही. त्याबाबत practical approach शिक्षकांना शिकवावा.

(८) हस्तपुस्तिका, संदर्भग्रंथ याचा वापर कसा करावा याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन द्यावे.

(९) प्रत्येक शालेय, विभागीय स्तरावर मूल्यशिक्षण विशेषांक काढावा व त्याकरिता शिक्षकांनी पुढाकार घ्यावा.

(१०) मूल्यशिक्षणाबाबत जिल्हास्तरावर शिक्षकांच्या हस्तलिखिताचा उपक्रम शिक्षकांनी राबवावा.

(११) शिक्षकांनी आपल्या शाळांमध्ये विविध उपक्रम राबवावे.
(१२) मूल्यशिक्षणावर आधारित विविध कृती संशोधनात शिक्षकांनी सहभाग घ्यावा.
(१३) मूल्यशिक्षण विषयक प्रकल्पामध्ये समाजाचा, पालकांचा सहभाग मिळावा म्हणून शहरी व ग्रामीण भागात खालील उपक्रम शिक्षकांनी मूल्यशिक्षणाच्या संदर्भात राबवावेत –

१. समाज प्रबोधन
२. पालक प्रबोधन
३. व्यवसनाधीनता कमी होण्यासाठी विशेष उपक्रम ग्रामीण भागात घ्यावेत.
४. स्त्रियांच्या उद्बोधनाकरिता ग्रामीण भागात विशेषत्वाने उद्बोधन वर्ग घ्यावेत.
५. शहरातील पालकांसाठी विशेष उद्बोधन वर्ग घ्यावेत.
६. शाळा सौंदर्यीकरणावर भर द्यावा.
७. प्रत्येक शिक्षकाने एक प्रकल्प हाती घेण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करावे.

(१४) दूरदर्शनवरील जाहिरातीत बऱ्याचदा शिक्षकांची टिंगल उडविणाऱ्या जाहिराती असतात. त्या सर्वप्रथम बंद करण्याबाबत पुढाकार घ्यावा.
(१५) विविध संस्कार शिबिरे, संस्कर वर्गाच्या माध्यमातून ही बाब शक्य होईल.
(१६) मूल्यशिक्षणात विविध दृक्‌श्राव्य साधनांचा वापर करावा जेणेकरून मूल्यशिक्षण अधिक मनोरंजक होईल.
(१७) शालेय स्तरावर अंतर्गत सेमिनारची संख्या वाढवावी व त्यात प्रत्येक शिक्षकाला सहभाग घेणे अनिवार्य करावे.
(१८) पालक मेळाव्याचे आयोजन करावे.
(१९) विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन वाढेल याकरिता विशेष उपक्रम शाळेत राबविण्यात यावेत.
(२०) ग्रामीण भागात साक्षरोत्तर कार्यक्रमांची संख्या वाढविण्यात यावी.
(२१) मूल्यशिक्षण अधिक अभिरुचीपूर्ण करण्यासाठी संगणकाच्या आधारे वेगवेगळ्या सी.डी. तयार करता येतील.
(२२) प्रत्येक विषयाचे अध्यापन हे मूल्याधिष्ठित होईल यावर भर असावा व त्या अनुषंगाने शिक्षकांच्या अडचणी लक्षात घेऊन त्या संदर्भात संशोधन करावे.
(२३) मूल्यसंक्रमण हे जाणीवपूर्वक व्हावे यासाठी शिक्षकांना विशेष मार्गदर्शन करावे.
(२४) पालक संपर्क वाढवावा.
(२५) प्रत्येक शिक्षकाने त्याचा आवडीचा विषय अध्यापनाकरिता मिळावा याकरिता मुख्याध्यापकांना विनंती करावी.
(२६) शिक्षक जे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात, ते नियोजनबद्ध असावे व त्याकरिता सांस्कृतिक कार्यक्रमाचे वार्षिक कॅलेंडर तयार करावे व त्याच्या काटेकोर अंमलबजावणीवर भर द्यावा.
(२७) अध्यापकाच्या व्यक्तिमत्त्व घडणीत त्याच्या उच्च शिक्षणाचा सहभाग फार मोठा असतो. म्हणून शिक्षकांनी उच्च शिक्षण घ्यावे.
(२८) शिक्षकांच्या प्रभावी अध्यापनाचा मूल्यशिक्षणावर प्रभाव पडतो आणि म्हणूनच अध्यापकाने अध्यापनाच्या विविध पद्धतीत कौशल्य प्राप्त करावे. प्रत्येक अध्यापन

पद्धतीचे बारकावे लक्षात घेऊन आपल्या अध्यापनाची स्वतंत्र शैली विकसित करावी.

(२९) व्यक्तिगत जीवनात शिक्षकाला कितीही समस्या असल्या तरी त्याचे प्रतिबिंब त्याच्या अध्यापनावर पडणार नाही ह्याची त्याने खबरदारी घ्यावी.

(३०) विद्यार्थ्यांची आपल्या शिक्षकांवर नितांत श्रद्धा असते. ह्या श्रद्धेला तडा जाणार नाही ह्याबाबत शिक्षकांनी सतर्क राहावयास हवे.

(३१) स्वतःच्या अध्यापकीय व्यक्तिमत्त्व विकासाकरिता शिक्षकात जागरूकता निर्माण व्हावयास हवी.

(३२) सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षकाला मूल्यशिक्षणाबाबत तळमळ असावी.

(३३) समाजातील प्रत्येक स्तरातील पालकांमध्ये मूल्यशिक्षणावर जाणीव जागृती व्हावी यासाठी विविध पालक उद्‌बोधन वर्ग घेण्यात यावे.

(३४) समाजातील अशैक्षणिक वातावरण घालविण्यासाठी समाजात शैक्षणिक उपक्रमात वाढ करावी. उदा. चर्चासत्रे, चांगल्या वक्त्यांची भाषणे, इत्यादी.

(३५) पालक संस्कार केंद्राचीसुद्धा कल्पना शिक्षकांच्या माध्यमातून समाजात साकार करावी.

(३६) अभ्यासक्रमातील मूल्यांबाबत प्रत्येक विषय शिक्षकाला मार्गदर्शन द्यावे.

(३७) अभ्यासक्रमातील मूल्यांबाबत प्रत्येक वर्गानुसार एक कार्यपुस्तिका तज्ज्ञांच्या आधारे तयार करण्यात यावी व त्या कार्यपुस्तिकेत पुढील घटकांचा अंतर्भाव असावा –

१. अभ्यासक्रम व मूल्ये.
२. घटकनिहाय अभिव्यक्त होणारे मूल्य.
३. घटकनिहाय मूल्यशोध तक्ते.
४. मूल्याधिष्ठित प्रश्न.
५. घटकनिहाय उपक्रमाबाबत मार्गदर्शन.
६. घटकनिहाय शैक्षणिक साधनांबाबत मार्गदर्शन.

(३८) प्रत्येक अध्यापकाने १००% मूल्यशोध तक्ते बनविण्यावर भर द्यावा व तशी सक्ती शिक्षकावर करण्यात यावी.

(३९) शिक्षकांचे अध्यापन जास्तीतजास्त मूल्याधिष्ठित व्हावे ह्याकरिता पाठ नियोजनाचा आराखडा हा मूल्याधिष्ठित असावा.

(४०) शिक्षकांनी जास्तीत जास्त कृती संशोधनात सहभागी होण्याकरिता शासनाने त्यांना किमान अनुदान उपलब्ध करून द्यावे.

(४१) अभ्यासक्रमातून अभिव्यक्त होणारी मूल्ये संक्रमित झाली आहेत अथवा नाही हे पाहण्याकरिता शिक्षकांनी काही चाचण्या विकसित करण्यावर भर द्यावा.

(४२) अशा चाचण्यांच्या माध्यमातून वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करावा.

(४३) शिक्षकांनी पालकांशी संपर्क अधिक वाढवावा.

(४४) विद्यार्थ्यांकरिता मूल्यशोधक प्रश्नावलीचा वापर करावा.

(४५) मूल्यमापनात केवळ वर्तन निरीक्षणावर भर न देता वर्तन चिकित्सेवर भर द्यावा.

(४६) मूल्यशिक्षणात आशय विश्लेषणावर भर द्यावा.

**मुख्याध्यापकांनी करावयाचे उपाय :**

(१) प्रत्येक मुख्याध्यापकांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली एका मूल्यशिक्षण समितीची स्थापना करावी. त्या समितीच्या माध्यमातून मूल्यशिक्षणाचे सर्व उपक्रम राबवावेत.

(२) प्रत्येक मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेत मूल्यशिक्षणाचे शिबिर भरवावे व त्याचा लाभ सर्व शिक्षकांना मिळेल यावर भर द्यावा.

(३) आपल्या शाळेतील शिक्षकांना ज्याप्रमाणे मूल्यशिक्षणाचे तात्त्विक ज्ञान आहे त्याचप्रमाणे त्यांची राबवणूक ते प्रत्यक्ष करतात किंवा नाही ह्याची स्वतः मुख्याध्यपकांनी नोंद घ्यावी व ह्याकरिता प्रत्येक शिक्षकाकरिता वेगळी नोंद त्यांनी ठेवावी.

(४) मूल्यशिक्षणाच्या संदर्भात स्वतःच्या शाळेत प्रत्येक मुख्याध्यापकांनी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करावे व त्यात प्रत्येक शिक्षकाचा सहभाग अनिवार्य करावा.

(५) तालुकास्तरावर प्रत्येक विषयाकरिता मूल्याधिष्ठित अध्यापनाचे कृतिसत्र आयोजित करण्याबाबत पुढाकार घ्यावा.

(६) संकलित नोंदपत्रिका वर्षातून किमान दोन वेळा भरल्या जात आहेत अथवा नाही याचा पाठपुरावा करावा.

(७) शिक्षकांचे अध्यापन हे मूल्याधिष्ठितच होईल यावर मुख्याध्यापकांनी भर द्यावा.

(८) तयार वार्षिक नियोजनानुसारच शिक्षक अध्यापन करतात पण मूल्यांच्या संदर्भात शिक्षक स्वतः वार्षिक नियोजन करतील यावर मुख्याध्यापकांनी भर द्यावा.

(९) शिक्षक आपल्या अध्यापनात विविध Interactive teaching Methodsचा अवलंब करतात किंवा नाही ह्याचे निरीक्षण आपल्या लॉगबुकमध्ये करावे व मूल्याधिष्ठित अध्यापनासाठी वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचे महत्त्व शिक्षकांना पटवून द्यावे.

(१०) आपल्या शाळेमध्ये मूल्यशिक्षणाच्या संदर्भातील दृक्‌श्राव्य साहित्य निर्मितीवर मुख्यापकांनी भर द्यावा. त्याचप्रमाणे इतर सर्व साहित्याचा शिक्षक अवलंब करीत आहे किंवा नाही ह्याकडे मुख्याध्यापकांनी कटाक्षाने लक्ष द्यावे.

(११) शिक्षकांची पाठ्यवचने मूल्याधिष्ठितच राहतील ह्याबाबत मुख्याध्यापकांनी दक्ष राहावे.

(१२) शिक्षक मूल्यशिक्षणाच्या संदर्भात संदर्भग्रंथ वाचावेत, याकरिता मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेत विविध संदर्भग्रंथ उपलब्ध करून द्यावेत व त्याचा वापर शिक्षक करतील याबाबत मुख्याध्यापकांचा कटाक्ष असावा.

(१३) आपल्या विषयाच्या संदर्भात प्रत्येक शिक्षकाने स्वतः मूल्यशोध तक्ते बनवावेत यासाठी मुख्याध्यापकांनी कृतिसत्र घेऊन मूल्यशोध तक्त्याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन करावे व मूल्यशोध तक्ते शिक्षक बनवितात अथवा नाही याकडे लक्ष पुरवावे.

(१४) शालेय घटकांत सर्व आंतरक्रियांचे व्यवस्थापन मुख्याध्यापकांनी असे करावे (Management of School Interaction) जेणेकरून शालेय वातावरण हे शुद्ध राहील.

(१५) शाळेतील शिक्षकांनी विविध प्रकल्प राबवावे, त्याचप्रमाणे कृतिसंशोधन करावे तसेच विविध शालोपयोगी उपक्रम शिक्षकांनी राबवावे व त्यांच्या माध्यमातून स्वतःचा, शाळेचा विकास घडवून आणावा. ह्याकरिता प्रत्येक शाळेत 'शिक्षक प्रबोधिनी'च्या स्थापनेची शिफारस करण्यात येत आहे.

(१६) वर्गांतर्गत मूल्यशिक्षण परिपाठात विविधता येण्याच्या दृष्टिकोनातून मुख्याध्यापकांनी शिक्षकांना प्रोत्साहित करावे, मार्गदर्शन करावे.

(१७) सर्व शिक्षकांना मूल्यमापन साधनांचे ज्ञान व्हावे. त्यांच्या वापराबाबत ज्ञान व्हावे, तसेच त्यांनी ते वापरावे ह्या तीनही स्तरांसाठी मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेत कृतिसत्राचे आयोजन करावे व आपला या संदर्भात Follow-up वाढवावा.

(१८) मुख्याध्यापकांनी आपल्या शाळा निरीक्षण कार्यात अधिक वस्तुनिष्ठता आणावी व त्याकरिता संशोधिकेने विकसित केलेल्या पडताळा सूचीचा अवलंब मूल्यशिक्षण निरीक्षण कार्यासाठी करावा.

(१९) शाळाबाह्य सामाजिक उपक्रमात शाळांनी सहभाग वाढवावा व हा सहभाग राष्ट्रीय स्तरावर व्हावा यासाठी शासनाने शाळांना अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत मुख्याध्यापकांनी पुढाकार घ्यावा.

(२०) शाळेचा भौतिक परिसर सुंदर व स्वच्छ ठेवण्यासाठी त्याचप्रमाणे शाळेच्या भिंती बोलक्या ठेवण्याच्या दृष्टिकोनातून मुख्याध्यापकांनी विशेष प्रयत्न करावेत.

(२१) विशेषतः शहरी भागातील मुख्याध्यापकांनी पालकांचा सहभाग अधिक वाढविण्याचा प्रयत्न करावा. पालक उद्बोधन वर्गाचे आयोजन वर्षातून किमान दोन वेळा तरी करावे.

(२२) शालेय स्तरावर शिक्षकांसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे आयोजन मुख्याध्यापकांनी करावे.

(२३) आपली शाळा ही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात एक उपक्रमशील प्रयोगशाळा असा लौकिक व गुणवत्ताप्राप्त करेल, ह्या दृष्टीने मुख्याध्यापकाने आपल्या शाळेची वाटचाल करावी.

(२४) शाळा प्रमुख म्हणून मूल्यसंस्कार करताना सहायक शिक्षकांची साथ मिळवावी व त्याचा विश्वास संपादन करावा.

(२५) आपल्या सहकारी शिक्षकांचे मार्गदर्शक बनावे.

(२६) आपल्या विद्यालयात विद्वान, समाजसेवक, समाज सुधारक, माजी स्वातंत्र्य सैनिक यांना निमंत्रित करून त्यांचे मौलिक विचार शिक्षक व विद्यार्थी यांच्यापर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

(२७) प्रत्येक मुख्याध्यापकाने स्वतःमध्ये अभ्यास, मनोवृत्ती, व्यासंग, जीवनविषय सकारात्मक दृष्टिकोन, शिक्षणविषयक दृष्टिकोन, भविष्यकालीन अचूक नियोजन इत्यादी गुण अंगीकृत करावे.

(२८) शाळाप्रमुख म्हणून दीपस्तंभाची, तर रोपाची निगराणी करणाऱ्या माळ्याची, तसेच सारथ्याचीहि भूमिका वठवावी.

(२९) प्रत्येक शिक्षकाला त्याच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्या विद्यार्थ्यांमध्ये कोणते मूल्य कमकुवत आहे ह्याबाबत सूचना द्यावयास सांगाव्या. पालकांना मूल्य

रुजवणुकीचा कालावधीही निर्धारित करून द्यावा.

**प्रशासकांनी करावयाचे उपाय –**

(१) महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळाने मूल्यशिक्षण कृती सत्राचे आयोजन बहुसंख्येने करावे. हे आयोजन केवळ शासन स्तरावरच राहायला नको, तर सेवाभावी संस्था, शिक्षक संघटना इत्यादींच्या साहाय्याने त्याचप्रमाणे विस्तार सेवा केंद्राच्या सहकार्याने राबविण्यात यावे.

(२) कृती सत्रांमधून सर्व शिक्षकांना मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण मिळेल याकडे शिक्षण खात्याने विशेष लक्ष द्यावे, नव्हे ज्याप्रमाणे M.S.C.I.T.चे प्रशिक्षण आज अनिवार्य केले आहे, तसेच मूल्यशिक्षण प्रशिक्षण प्रत्येक शिक्षकास अनिवार्य करावे. या कृती सत्रातून घेतलेल्या प्रशिक्षणाप्रमाणेच शिक्षक हे मूल्यशिक्षण राबवीत आहेत अथवा नाही ह्याकरिता शासन स्तरावर वेगळी निरीक्षण यंत्रणा असावी.

(३) मूल्यशिक्षण शिबिरे परिणामकारक होतील यावर कटाक्ष असावा.

(४) ही कृती सत्रे प्रभावी होण्यासाठी खालील सूचना सुचविण्यात येत आहेत –
१. कृती सत्राअंतर्गत शिक्षक संख्या मर्यादित असावी.
२. प्रत्येक अध्यापकास कृती सत्र आवश्यक राहील.
३. कृती सत्रामध्ये मुद्याला अनुसरून मुक्त चर्चा व्हावी.
४. कृती सत्रात अनुभव कथन व प्रात्यक्षिकास प्राधान्य असावे.
५. अनुभवी व प्रशिक्षित तज्ज्ञांकडून कृती सत्रात मार्गदर्शन व्हावे.

(५) मूल्यशिक्षणाच्या यशस्वितेकरिता प्रत्येक शाळेत शासन स्तरावर मूल्य शिक्षक नेमावा व त्याच्याकडे मूल्यशिक्षण कार्य सर्वंकष दृष्टिकोनातून सोपविण्यात यावे.

(६) मूल्यशिक्षणाच्या संदर्भात शासन स्तरावर जे साहित्य उपलब्ध आहे, ते शाळेत उपलब्ध करून देण्यासाठी मुख्याध्यापकांचा कटाक्ष असावा.

(७) हे सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने अनुदान उपलब्ध करून द्यावे.

(८) ग्रामीण भागात ह्या सर्व साहित्याची उपलब्धता आहे अथवा नाही, त्याचप्रमाणे या साहित्याचा वापर शिक्षक करतात किंवा नाही याचा पाठपुरावा शासनस्तरावर करावा.

(९) शाळांमध्ये जास्तीतजास्त उपक्रम व्हावेत ह्याकरिता शिक्षकांना उत्तेजनार्थ काही योजना राबविण्यात याव्या. त्यामुळे मूल्यसंवर्धनार्थ विविध उपक्रम राबविण्यासाठी शिक्षक प्रेरित होतील.

(१०) विविध प्रकल्प अथवा कृती संशोधन करण्याकरिता शासनाने शिक्षकांना अनुदान द्यावे.

(११) शिक्षण सेवक ह्या पदामुळे शिक्षकांना आर्थिक प्रेरणा राहिली नाही. त्यामुळे त्यांचे अध्यापनात लक्ष लागत नाही. ह्याकरिता सर्वप्रथम शासनाने शिक्षण सेवकांचे मानधन वाढवून द्यावे.

(१२) व्यवसायनिष्ठ शिक्षक ह्या प्रणालीत येतील यासाठी पात्रता चाचणीची योजना असावी.

(१३) समाजामध्ये मूल्यशिक्षणाबाबत जागृती होण्यासाठी सेवाभावी संस्थांनी पुढाकार घ्यावा.

(१४) वैफल्यग्रस्त शिक्षकांसाठी एक 'समुपदेशन केंद्र' शासनाने उघडावे.

(१५) कायद्यातील काही त्रुटी दूर कराव्यात जेणेकरून समाजात मूल्य सांभाळताना व्यक्तीला भीती वाटणार नाही.

(१६) प्रसारमाध्यमाच्या बदलत्या स्वरूपावर शासनाने तावडतोब नियंत्रण आणावे व हीन होत चाललेल्या सामाजिक अभिरुचीला पायबंद घालावा.

(१७) सामाजिक संस्था, समाजसेवक यांनी संस्कार (बालक) केंद्र काढावे. ह्याकरिता त्यांना शिक्षण विभागाने आवाहन करावे.

(१८) अभ्यासक्रमाचे अध्यापन मूल्याधिष्ठित होण्याकरिता बी.एड. स्तरावर Value Education हा विषय आवश्यक करावा.

(१९) ह्या संशोधनाच्या माध्यमातून अशी शिफारस करण्यात येत आहे की, मूल्यशिक्षणाबाबत आता पारंपरिक मूल्यमापन प्रणाली शासनाने अवलंबू नये, तर त्यासाठी 'Diagnostic Approach' वापरण्यात यावा.

(२०) मूल्यमापनाच्या विविध साधनांचा वापर कसा करावा याबाबतच प्रशिक्षण वर्ग, कृतीसत्र, चर्चासत्र शिक्षण विभागाने आयोजित करावे.

(२१) प्रशासकांनी मूल्यशिक्षणाबाबत आपल्या तालुक्याचा विचार करून एक पडताळा सूची विकसित करावी.

(२२) जे शिक्षक प्रशासकांच्या दृष्टिकोनातून मूल्यशिक्षणाकरिता अयोग्य वाटतात त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

(२३) प्रत्येक शाळेमध्ये 'शिक्षक प्रबोधिनी' स्थापन करण्याबाबत शाळांना आदेश द्यावेत.

(२४) ग्रामीण, तालुका व जिल्हास्तरीय आदर्श मूल्यशिक्षक, आदर्श विषय शिक्षक, अशा विविध पुरस्कारांची घोषणा करावी.

(२५) ज्या शिक्षकांचे दुय्यम व्यवसाय आहेत व ज्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे त्यांच्यावर कठोर कार्यवाही करावी.

(२६) प्रशासकांनी आपले निरीक्षण कार्य अचूक व वस्तुनिष्ठ होईल यावर भर द्यावा.

(२७) प्रशासकांनी शिक्षकांच्या अनौपचारिक भेटी घ्याव्यात.

(२८) जे शिक्षक ग्रामीण भागात निवासी नाहीत त्यांनी तेथेच निवासी व्हावे असा शासनाचा आदेश आहे. परंतु ह्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या शिक्षकांबाबत प्रशासकांनी कार्यवाही करावी.

(२९) 'मूल्यशिक्षण अभियाना'च्या (संशोधिकेने याबाबत कृती आराखडा तयार केला आहे) संदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही होण्याच्या दृष्टिकोनातून शासनाकडे शिफारस करावी.

(३०) विविध शाळांमधील भौतिक सुविधा व्यवस्थित असाव्या याबाबत अनुदान प्रस्ताव वारंवार शासनाकडे पाठवावे.

(३१) विस्तार सेवा केंद्रामार्फत मूल्यशिक्षण प्रशिक्षणाची कृती सत्रात वाढ करावी व कृती सत्र हे केवळ एका परिपाठापुरते मर्यादित न ठेवता प्रत्येक विषयाकरिता हे

कार्य करावे.

(३२) विस्तार सेवा विभागाने आपले प्रशिक्षणाचे कार्य केवळ जिल्ह्याच्या ठिकाणीच न चालविता तालुक्याच्या ठिकाणी अशा वर्गाचे आयोजन करावे व ग्रामीण पातळीवरील शिक्षकांचा जास्तीत जास्त सहभाग मिळवावा.

(३३) प्रत्येक शिक्षक हा प्रशिक्षित असावा या दृष्टीने शिक्षण विभागाने '१००% प्रशिक्षित शिक्षक' ही योजना राबवावी व हे प्रशिक्षण मूल्यशिक्षण संदर्भात असावे.

(३४) प्रत्येक वर्ग शिक्षकाच्या दृष्टिकोनातून 'पालकांशी प्रत्यक्ष संपर्क' हा उपक्रम राबविणे अनिवार्य करावे.

(३५) वास्तविक शिक्षण क्षेत्रावर संपूर्ण राष्ट्राची भिस्त असते. नेमका शिक्षकांच्याच बाबतीत शासन पैशाची कुचंबणा करते. एखाद्या Software Engineerला Engineerचा पाया मजबूत करणारा शिक्षक हा 'शिक्षण सेवक' ह्या उदात्त नावाखाली दबून उपेक्षित राहतो ह्याची गांभीर्याने दखल शासनाने घ्यावी.

**शहरी पालकांनी करावयाचे उपाय :**

(१) केवळ नोकरीवर लक्ष न देता माता-पालकांनी आपल्या पाल्याच्या मूल्यविकासाकडे लक्ष द्यावे.

(२) विविध संस्कार वर्ग आपल्या पाल्यांना उपलब्ध करून द्यावे.

(३) गृहिणी, माता, पालकांनी सेवाभावी वृत्तीने संस्कार वर्ग राबवावे.

(४) अभ्यासाचा उगाच बडगा आपल्या पाल्याच्या बाबतीत करू नये.

(५) स्वतः सिनेमा, नाटके त्याचप्रमाणे दूरदर्शनवरील कोणते कार्यक्रम पाहावेत याबाबत विवेकबुद्धी जागृत ठेवावी.

(६) आपल्या पाल्याच्या मूल्यविकासासाठी शिक्षकांशी संपर्क ठेवावा.

(७) पालक मेळाव्यात माता-पिता, पालकांनी पाल्याच्या मूल्यविकासाबाबत चर्चा करावी.

(८) आधुनिक तंत्र-विज्ञानाच्या आहारी जाऊन आपला पाल्य नैतिकदृष्ट्या ढासळत तर नाही, याकडे विशेष लक्ष पुरवावे.

(९) आपल्या पाल्याच्या प्रत्येक वर्तन बदलाकडे बारकाईने लक्ष द्यावे.

(१०) आपल्या पाल्याचे अनाठायी लाड पुरवू नये, त्याला ऐदीपणा शिकवू नये.

(११) पारंपरिक व आध्यात्मिक मूल्यांवर पालकांनी विश्वास ठेवावा.

(१२) घर हे संस्कार केंद्र होईल याकडे पालकांनी लक्ष द्यावे.

(१३) माता-पिता, पालकांनी आपसातील संबंध ताणतणावग्रस्त ठेवू नयेत.

(१४) आपल्या पाल्याच्या दृष्टिकोनातून आपले वर्तन आदर्श राहील याकडे लक्ष द्यावे.

(१५) शाळेच्या प्रत्येक उपक्रमाबाबत जागरूकता दाखवावी.

(१६) आधुनिकीकरणाच्या नावाने पाश्चात्त्यीकरणाच्या आहारी जाऊ नये.

(१७) पिता, पालकांनी स्वतःला काही व्यसने असल्यास ती सोडावी.

(१८) घरगुती वातावरण हे आदर्श राहील याकडे लक्ष द्यावे.

(१९) आपल्या पाल्यावर सुसंस्कार होतील याबाबतीत पालकांनी प्रत्येक क्षणी दक्ष असावे.

(२०) नवीन पिढीशी जमवून घेताना पालकांना विशेष दक्षता बाळगावी लागेल. विशेषतः

विषमलिंगी मैत्री, त्यातून उद्भवणारे एकतर्फी प्रेम यामध्ये आपला पाल्य कुठे गुरफटत तर नाही ना? याबाबत पालकांनी सावध राहावे.

(२१) मूल्य विकसनाच्या बाबतीत शिक्षकांना विश्वासात घ्यावे.

(२२) विविध चॅनलच्या माध्यमातून संस्कारहीन कार्यक्रम दाखविले जातात, त्या चॅनलवर बंदी आणण्याकरिता पालकांनी प्रयत्न करावे.

(२३) अशा जाहिरातींना विरोध करावा ज्या जाहिरातींमध्ये पालक व शिक्षक यांची विटंबना आढळते. उदा. पेप्सोडेंटची जाहिरात.

(२४) दूरदर्शन संस्कृतीचा परिणाम आपल्या पाल्यावर होणार नाही याबाबत दक्ष असावे.

(२५) सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या पाल्याच्या आयुष्यात नैराश्य उत्पन्न होणार नाही याकरिता त्याच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन कसा रुजविता येईल याबाबत दक्ष असावे.

(२६) मूल्यशिक्षण प्रबोधनाचे वर्ग माता-पालकांनी करावे.

**ग्रामीण पालकांनी करावयाचे उपाय :**

(१) पालकांनी साक्षर व्हावे व सुसंस्कृत होण्याचा प्रयत्न करावा.

(२) पितृ पालकांनी आपली व्यसनाधीनता सोडावी.

(३) रूढीप्रियता व पारंपरिक दृष्टिकोन याचा त्याग करावा व आधुनिक दृष्टिकोन अवलंबावा.

(४) दरिद्री परिस्थितीत स्वावलंबी व स्वाभिमानी कसे राहावे ह्याचे प्रशिक्षण आपल्या पाल्याला द्यावे.

(५) साक्षर पालकांनी संस्कार वर्ग चालवावे व याकरिता समाज सेवकांची त्याचप्रमाणे शाळेतील शिक्षकांची मदत घ्यावी.

(६) माता व पितृ पालकांनी आपले अज्ञान त्यागण्याचा प्रयत्न करावा.

(७) आपल्या पाल्याच्या प्रत्येक वर्तन बदलाची दखल घ्यावी, नोंद घ्यावी.

(८) आपल्या पाल्याला आपली आवश्यकता आहे, हे सत्य डोळ्यासमोर ठेवून पाल्याला योग्य तो वेळ द्यावा.

(९) आदिवासी पालक जे अतिशय अज्ञानी आहेत, रूढीप्रिय आहेत त्यांनी आधुनिकीकरणाची कास धरण्याचा प्रयत्न करावा.

(१०) आपल्या घरातील वातावरण भांडणतंट्याचे न ठेवता शांततेचे ठेवावे.

(११) आपला पाल्य संस्कारांच्या संदर्भात कोठे मागे आहे याबद्दल शिक्षकांशी योग्य ती चर्चा करावी.

(१२) जे पालक नवसाक्षर आहेत त्यांनी विविध साक्षरोत्तर कार्यक्रमात सहभाग घ्यावा.

(१३) आपला पाल्य बालमजूर बनवू नये व त्याला मजुरीवर पाठवून त्याच्या मार्फत पैसा कमविण्याचा सपाटा पालकांनी करू नये.

सर्वांत महत्त्वाची बाब ही, की आज शिक्षणामध्ये ज्या ज्या काही नवीन बाबी अंतर्भूत होतात याचे ज्ञान पालकांनी प्राप्त करावे. शिवाय पालकांकरिता शासन स्तरावर जर काही उपक्रम राबविले जाणार असतील तर त्यामध्ये पालकांनी सहभाग घ्यावा व आधुनिक बदलत्या परिवर्तनीय जगाशी समायोजन साधण्याचा पालकांनी प्रयत्न करावा.

**मूल्यशिक्षण व कृती कार्यक्रम :**

मूल्यशिक्षणाच्या संदर्भात आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा एक फार मोठी उणीव त्यात आढळते, ती ही, की आज मूल्यशिक्षणावर बरेचसे साहित्य उपलब्ध आहे, मूल्यशिक्षण कसे राबवावे याचे मार्गदर्शन या साहित्यात आढळते. हे सर्व साहित्य मार्गदर्शकाची भूमिका करते, पण ते मार्गदर्शक या स्तरावर मर्यादित आहे. पण आता आवश्यकता आहे 'मूल्य शिक्षण अभियाना'ची. अभियान म्हणून राबविले तरच याची यशस्विता होणार आहे. या अभियानामुळेच मूल्यशिक्षणाची गुणवत्ता वाढू शकेल व ही गुणवत्ता वाढविण्यासाठी अनेक घटकांचे संघटित प्रयत्न ठरावे लागतील. या घटकांच्या प्रयत्नांची दिशा ठरवावी लागेल. सद्यस्थितीत ते अवघड आहे पण अशक्य नाही. आणि म्हणूनच या संशोधनाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण मूल्यशिक्षणासाठी 'मूल्य शिक्षण अभियान' सुचविण्यात येत आहे.

कोणतेही शिक्षण गुणवत्तापूर्ण असण्यासाठी खालील परिमाणे आवश्यक असतात:

(१) त्या शिक्षणाची ध्येय व उद्दिष्टे निश्चित व सुस्पष्ट असावी लागतात.
(२) ही ध्येये व उद्दिष्ट यांना अनुरूप त्या त्या स्तरावर अभ्यासक्रम आखावे लागतात.
(३) या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेकरिता आवश्यक सुविधा निर्माण कराव्या लागतात, त्याकरिता सुयोग्य साहित्य व साधने पुरवावी लागतात.
(४) ह्या सुविधांचा, साहित्याचा उपयोग करणाऱ्या मनुष्यबळाची योजना करावी लागते व त्याकरिता काही आर्थिक तरतूद करावी लागते.
(५) स्थळ, काळ, परिस्थिती यांना अनुरूप मूळ ध्येयांना अनुलक्षून नवनवीन व लवचिक अशा कार्यपद्धतींचा अवलंब करावा लागतो.

वरीलप्रमाणे ही गुणवत्तेची परिमाणे आहेत. गुणवत्ता विकासाची प्रक्रिया म्हणजे अनेक क्रियांची एक सुरेख गुंफण असते. शिक्षणाच्या संदर्भात पायाभूत नियोजनापासून अध्ययन, अध्यापन, प्रशिक्षण इ.अनेक क्रियांचा यात अंतर्भाव होतो. गुणवत्ता विकासाचे संख्यात्मक निकष बरेचदा फसवे ठरतात. नियोजन हा सर्व कार्याचा प्रारंभबिंदू असतो. हे तयार करताना ग्राम पातळीपासून त्या स्तराच्या गरजा लक्षात घेऊन तो करावा लागतो. शाळानिहाय, वर्गनिहाय, विषयनिहाय असावा लागतो. मूल्यशिक्षणाच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास व्यक्तिमत्त्व विकासासाठी औपचारिक व अनौपचारिक मार्गांनी शाळेत प्रभावी शैक्षणिक वातावरणात असावे याकरिता पुढील बाबी मार्गदर्शक ठरतात.

(१) अध्ययन हे ज्ञान–विज्ञान व संस्कारकेंद्री असावे.
(२) शिक्षकांचे अध्यापन विद्यार्थीकेंद्री व अध्ययनास प्रेरक ठरेल.
(३) याकरिता दिले जाणारे प्रशिक्षण केवळ कौशल्य विकसित करणारे नको, तर त्यातून शिक्षकांचा वृत्तीविकासही व्हावा.
(४) शैक्षणिक व्यवस्थापन, प्रशासन हे गुणग्राहक असावे. त्याचप्रमाणे उपक्रमशीलतेला वाव देणारे असावे.
(५) सामूहिक प्रयत्न हा शैक्षणिक संघटनेचा गाभा असावा.
(६) मूल्यमापन हे गुणवत्तेची ओळख व उणीवांची जाणीव करून देणारे असावे.
(७) नियोजन हे व्यक्तिगत, प्रशासकीय व संस्थेच्या कार्याला दिशा देणारे असावे.

हे सर्व करण्यासाठी शालेय घटकांत परस्पर जिव्हाळा असावा लागतो. ह्यासाठी खालील सूत्रे महत्त्वाची ठरतात.

(१) अध्ययन परायण विद्यार्थी.
(२) विद्यार्थी व उपक्रम परायण शिक्षक.
(३) शिक्षकाभिमुख मुख्याध्यापक.
(४) उपक्रमशील संस्थाचालक.
(५) अध्ययनाबाबत आस्था बाळगणारे पालक.
(६) गुणवंतांचा शोध घेणारे व प्रेरणा देणारे अधिकारी.
(७) शिक्षणाबाबत प्रेम करणारे लोकप्रतिनिधी.

ह्या सर्व बाबी गुणवत्ता विकासाकरिता पोषक ठरतात. म्हणूनच मूल्यशिक्षण हे ह्याच पद्धतीने गुणवत्तापूर्ण व्हावे म्हणून पुढील कृती आराखडा सुचविण्यात येत आहे. (हा कृती आराखडा गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संदर्भात NCERT ने प्रसिद्ध केलेल्या दर्जेदार शिक्षणाच्या 'नव्या दिशा' ह्या पुस्तकात सुचविण्यात आल्या होत्या. ही पुस्तिका १९९५ मध्ये प्रकाशित करण्यात आली होती.)

**कृती आराखड्याची राबवणूक प्रक्रिया :** मूल्य शिक्षण अभियानाची प्रशासकीय यंत्रणा

(१) मूल्य शिक्षण अभियानाचे नियोजन करण्यासाठी जिल्हा स्तरावर नियोजन समितीचे गठन करण्यात यावे व त्यात प्रामुख्याने पुढील प्रशासकीय घटकांचा अंतर्भाव करावा.

**(अ) जिल्हास्तरीय नियोजन समिती** – ह्या समितीत खालील सदस्यांचा अंतर्भाव करावा.

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
२. शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)
३. गटशिक्षणाधिकारी
४. मुख्याध्यापक
५. विस्तार अधिकारी
६. एन.जी.ओ. प्रतिनिधी

**(ब) गटस्तरीय नियोजन समिती** – ह्या नियोजन समितीत खालील सदस्यांचा समावेश असावा.

१. गटशिक्षणाधिकारी
२. मुख्याध्यापक
३. एन.जी.ओ. प्रतिनिधी
४. शिक्षक
५. पालक प्रतिनिधी

**(क) ग्रामीण स्तरीय नियोजन समिती** – ह्या समितीत खालील सदस्य प्रत्येक ग्रामीण स्तरावर असावा.

१. शिक्षण सभापती, ग्राम पंचायत
२. मुख्याध्यापक
३. निवडक शिक्षक
४. समाजसेवक
५. निवडक पालक

जिल्हा स्तरावर D.R.C.V.E. (District Resource Centre for Value Education) ची स्थापना करावी व हे केंद्र N.R.C.V.E. (National Resource Centre

for Value Education) शी संलग्न असावे.

जिल्हा स्तरावर Core Committee for Introduction for Human Valuesची संरचना करावी व ती H.R.D. linkage असावी. ह्या समितीत पुढील प्रशासकीय घटकांचा अंतर्भाव असावा.

(१) विभागीय संचालक
(२) विभागीय उपसंचालक
(३) शिक्षणाधिकारी
(४) H.R.D. Resource Person
(५) मुख्याध्यापक
(६) शिक्षक
(७) एन.जी.ओ. प्रतिनिधी

जिल्हा स्तरावर एक District Group of Experts for Introduction of Education in Human Values ची स्थापना करावी व त्यात विविध तज्ज्ञांचे त्याचप्रमाणे सर्वधर्मीय आध्यात्मिक तज्ज्ञांचा समावेश असावा.

**मूल्य शिक्षण अभियानात समाविष्ट इतर बाबी :**

मूल्य शिक्षण अभियानात खालील बाबींची योजनात्मक दृष्टिकोनातून शिफारस करण्यात येते.

**शिक्षक प्रशिक्षण** : मूल्य शिक्षणाच्या संदर्भात खालील प्रकारच्या प्रशिक्षणांची शिफारस करण्यात येत आहे.

१. प्रत्येक शिक्षकाकरिता सेवांतर्गत प्रशिक्षण — २० दिवस
२. अप्रशिक्षित शिक्षकांकरिता उजळणी वर्ग — २० दिवस
३. नुकतेच प्रशिक्षित झालेल्या शिक्षकांसाठी उद्बोधन वर्ग — ३० दिवस

- वरील सर्व प्रशिक्षणासाठी D.C.E.R.T. व D.I.E.T. व विस्तार सेवा विभागाचे सहकार्य असावे.
- शिक्षकांना पुरेसे वेतन, बोनस व आर्थिक प्रेरणा देण्यात यावी.
- टिचर फोरमची स्थापना करण्यात यावी.
- विस्तार सेवेच्या माध्यमातून शिक्षकांसाठी विविध शिबिरे, कृती सत्र इत्यादींचे आयोजन त्याचप्रमाणे साहित्य निर्मितीकरिता व वापराकरिता 'दृक्‌श्राव्य कृती सत्र'चे आयोजन व त्याकरिता पुरेसे आर्थिक अनुदान.
- मूल्य शिक्षणावरील संशोधनाकरिता आर्थिक मदत.
- शिक्षकांच्या कृती संशोधनास विशेष प्राधान्य.
- १००% प्रशिक्षित शिक्षक योजनेची अंमलबजावणी.
- स्थानिक गरजेनुसार शिक्षकांना बोलीभाषेचे प्रशिक्षण.
- शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयात गुणांच्या आधारावर शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची निवड न करता शिक्षकी व्यवसायाकरिता योग्य अभिवृत्ती असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची निवड व्हावी ह्याकरिता Qualifing Attitude Test असावी.
- माध्यमिक स्तरावर Padagogical Renewal करिता अभ्यासक्रमाच्या व Text book च्या revision वर भर देण्यात येईल.
- काही Academic Groups ची स्थापना.

- विद्यार्थी केंद्रे व आंतरक्रियात्मक अध्यापक पद्धतींचा कटाक्षाने वापर.
- मूल्य शिक्षणाच्या संदर्भात Diagnostic Approach.
- अति मागासलेल्या जमातींकरिता मूल्य शिक्षणाबाबत Need base योजना.
- S.A.S. अर्थात Students Assessment Scheme चा अवलंब.
- प्रसार माध्यमांचा वापर मूल्य शिक्षणाच्या बळकटीसाठी कसा करायचा, याचे मार्गदर्शन.
- गट संमेलनाचे प्रत्येक महिन्यात आयोजन.
- ग्रामीण भागात तसेच शहरी भागात आधुनिक शैक्षणिक साहित्याची उपलब्धता करून देणे.
- Community Participation Programmes चे आयोजन.
- माता–पिता–पालक यांच्या उद्बोधन वर्गांचे आयोजन.
- Development of Audio-video cassettes in Community Mobilization.
- विशेष संस्कार शिक्षकांची नेमणूक व त्यांचे प्रशिक्षण व उद्बोधन.
- विशेष संस्कार शाळांची स्थापना.
- विशेष बालकांच्या मूल्य शिक्षणाकरिता विशेष योजनेची निर्मिती.
- मूल्य शिक्षणाबाबत Monitoring System ची निर्मिती.
- ग्राम पातळीवर व जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर मूल्यमापन केंद्रांची स्थापना.
- शिक्षकांच्या Self Apprisal ची निर्मिती व त्याच्या माध्यमातून शिक्षकांच्या स्वयंमूल्यांकनावर भर.
- संस्कार वर्ग चालविण्यासाठी समाजातील गृहिणी मातांना विशेष प्रोत्साहन.
- जिल्हा, तालुका व ग्रामीण पातळीवर मातृ–पितृ प्रबोधन केंद्राची स्थापना.
- विविध स्तरावर माता–पालक मेळाव्यांचे आयोजन.
- विविध आध्यात्मिक संस्थांचा सहभाग.
- जे विद्यार्थी शिक्षणापासून दूर आहेत त्यांना या अभियानात सामील करून घेण्यासाठी Back to the School ह्या संदेशाच्या माध्यमातून उपक्रम.
- मूल्यमापन प्रणालीचे चतु:सूत्रीचा अवलंब शिक्षक, पालक, विद्यार्थी व मित्र हे मूल्यमापनातील महत्त्वाचे घटक असावेत.
- Bridge and remidial cources for students ची शिफारस जे विद्यार्थी मूल्यसंस्कारात मागे आहेत त्यांच्याकरिता करण्यात येत आहे.
- विद्यार्थी पालकांकरिता School evaluation questionaire त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांकरिता Teachers eavaluation questionaire ची शिफारस करण्यात येत आहे.
- **मूल्यमापनाच्या बाबतीत खालील चार स्तर सुचविण्यात येत आहेत –**
  १. प्रारंभिक
  २. विकासात्मक
  ३. नैदानिक
  ४. अंतिम

याशिवाय प्रमाणके संदर्भ चाचणी तसेच निकष संदर्भ चाचणी ह्यांचा अवलंब करून मूल्यमापन सर्वंकष बनवावे.

- शालेय स्तरावर Educational Material Library विकसित करण्याकरिता प्राधान्य द्यावे व त्याकरिता अध्यापक महाविद्यालयांची मदत घ्यावी.
- मूल्य शिक्षणाच्या अभियानाच्या पर्यवेक्षणाचे कार्य करण्यासाठी खालील समितीची स्थापना करावी.

District Supervision Committee ही S.C.E.R.T ची जिल्हा शाखा असेल व त्यात खालील सदस्य राहतील

१. जिल्हा परिषद अध्यक्ष
२. शिक्षण सभापती
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
४. सर्व गटशिक्षणाधिकारी

- District Executive Committee ची शिफारस करण्यात येत आहे. मूल्य शिक्षणाच्या राबवणुकीबाबत सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचा अधिकार या समितीचा असेल. जिल्हा परिषद सदस्यांशी निगडित असणारी ही समिती असेल.
- Work Sub Committee मूल्य शिक्षणाच्या संदर्भात स्थानिक सूचनेनुसार विविध उपक्रमांची रचना कशी करायची याचे अधिकार या समितीला राहतील.
- Purchase Sub Committee ची शिफारस करण्यात येत आहे. मूल्य शिक्षणाच्या संदर्भात आवश्यक असणाऱ्या सर्व भौतिक सुविधा प्रत्येक शाळेला पुरविण्याची जबाबदारी या समितीची असेल.

वरील सर्व समित्या S.C.E.R.T. ने निर्धारित केलेल्या नियमानुसार कार्य करतील.

- मूल्य शिक्षणाकरिता एक Resource Group ची स्थापना करण्यात यावी व त्यात खालील घटकांचा सहभाग घ्यावा.
  - प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय
  - समन्वयक, विस्तार सेवा विभाग
  - प्राचार्य, जिल्हा शिक्षक प्रशिक्षण संस्था
  - शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
  - अधिव्याख्याता, शासकीय अध्यापक महाविद्यालय
  - गटशिक्षणाधिकारी
  - विस्तार अधिकारी
  - राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापक
  - संशोधन व मूल्यमापन अधिकारी
  - विशेष शिक्षक
  - एन.जी.ओ. प्रतिनिधी

या अभियानात समाविष्ट असणाऱ्या सर्वच बाबींकरिता शासनाने अनुदान निर्धारित करावे व त्याप्रमाणे हे अनुदान द्यावे. वरीलप्रमाणे शासनाने कृती आराखडा विविध तज्ज्ञांना देऊन त्यावर सखोल विचारमंथन करावे व त्यानुसार मूल्य शिक्षण अभियान राबवावे, व त्यात समाजातील प्रत्येक घटक कसा सहभागी होईल ह्याबाबत विचार करावा. असे केले तरच मूल्य शिक्षण प्रभावी होईल. अन्यथा मूल्य शिक्षण केवळ वेळापत्रक साजरे करणारा उपक्रम ठरेल.

## मूल्य शिक्षण अभियान कृती आराखडा

| अनु. क्र. | कृती कार्यक्रम | कुणासाठी | कशासाठी | केव्हा | कोणाची जबाबदारी | अन्य तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | उद्दिष्टांचे निर्धारण | शिक्षण प्रक्रिया | मूल्याधिष्ठित शिक्षणातून होणाऱ्या निष्पत्तीचे निर्धारण | सत्राच्या प्रारंभी | संचालक जिल्हा प्रशिक्षण संस्था, विस्तार केंद्र व अध्यापक महाविद्यालय | सध्या अस्तित्वात असलेल्या उद्दिष्टांत काही बदल करणे आवश्यक आहे. त्याचा शोध घेणे, ग्रामीण, जिल्हा पातळीनुसार त्याचे स्वरूप लवचिक राहावे. |
| (२) | सेवांतर्गत प्रशिक्षण | शिक्षक मुख्याध्यापक प्रशासकीय अधिकारी प्रशिक्षक | मूल्याधिष्ठित अभ्यासक्रम, पाठ्यक्रम नियोजन, अध्ययन अध्यापन पद्धती, साहित्य निर्मिती, मूल्यमापन व स्वयंमूल्यमापन, गुणवत्ता वाढीचे कार्यक्रम इत्यादीबाबत मार्गदर्शन व्हावे | वर्षभरातून किमान एकदा | माध्यमिक शिक्षण विभाग विस्तार सेवा विभाग | आवश्यकतेनुसार ह्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवावी. ह्यात खाजगी दर्जेदार संस्थांचा सहभाग घ्यावा. |
| (३) | साहित्य, साधनांची निर्मिती | शिक्षक | आपल्या विषयाच्या संदर्भात आवश्यक मूल्याधिष्ठित अध्यापनाची दृष्टी मिळावी | इयत्तानिहाय सत्रांतर्गत | संबंधित शिक्षक | माध्यमिक शिक्षण विभागाच्या हस्तपुस्तिकांचा आधार घेऊन अशी साहित्य निर्मिती शिक्षकांनी |

| अनु. क्र. | कृती कार्यक्रम | कुणासाठी | कशासाठी | केव्हा | कोणाची जबाबदारी | अन्य तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| | (अ) विषयनिहाय मूल्य शिक्षण (ब) मूल्याधिष्ठित स्वाध्याय संच | विद्यार्थ्यांसाठी | मूल्याधिष्ठित अध्ययनाचे वळण लागावे | वर्ग निहाय सत्रांतर्गत | प्रत्येक विषय व शिक्षक विस्तार सेवा यांच्या कृती सत्रातून सहभाग घेऊन | स्वत: करावी. स्वाध्यायाचे नमुने विकसित करून जि.प., नगर पालिका यांना पुरविले जातील व ह्या संस्था प्रत्येक शाळेला स्वाध्याय पुस्तिका पुरवितील. |
| | (क) साहित्य निर्मिती व वापराबाबत प्रशिक्षण | शिक्षक | मूल्यशिक्षण अधिक मनोरंजक व कृतिप्रधान करण्यासाठी | प्रतिवर्ष | विस्तार सेवा केंद्र, अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालय | शिक्षक ही साधने वापरतात किंवा नाही याचे अनुधावन व्हावे. |
| (४) | अनुभवांचे वाटचाल | उपक्रमशील शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशिक्षक व | अनुभवाची देवाण-घेवाण शैक्षणिक समस्यांची सोडवणूक नवीन कार्यपद्धतींचा शोध उपक्रमशील | वर्षातून किमान एकदा | शिक्षणाधिकारी, विस्तार सेवा केंद्र, शिक्षण संचालक | किमान १० शिक्षकांना तरी अंतर्भाव ह्यात व्हावा. |

| अनु. क्र. | वृत्ती कार्यक्रम | कुणासाठी | कशासाठी | केव्हा | कोणाची जबाबदारी | अन्य तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अधिकारी | शिक्षकांना प्रोत्साहन | | | |
| (५) | स्वयंविकास | नवीन सेवाप्रविष्ठ शिक्षक | स्वयंमूल्यमापन याकरिता मार्गदर्शन व निष्ठा संवर्धन | परिविक्षा कालावधी संपल्यावर पहिल्याच वर्षी | पंचायत समिती, नगर पालिका यांच्या शिक्षण समिती | शिक्षकी व्यवसायाचे स्वरूप, दर्जा पावित्र्य याबाबत शिक्षकांना परिचय व्हावा. |
| (६) | नैदानिक चाचण्या व उपचारात्मक अध्यापन | माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी | मूल्य शिक्षणाच्या माध्यमातून रुजलेल्या मूल्यांबाबत निदान होणे आवश्यक आहे व कमकुवत घटक दूर होणे. | इयत्ता ८ वीत प्रवेश झाल्यावर प्रत्येक वर्गात प्रवेश घेण्यापूर्वी | शिक्षणतज्ज्ञ, माध्यमिक शिक्षण विभाग, शिक्षक, मुख्याध्यापक | नैदानिक चाचण्यांबाबत अनुधावन व्हावे. (ह्या चाचण्या एका समान संशोधनात स्वत: संशोधिकेने विकसित केल्या आहेत.) |
| (७) | शाळा सुधार योजना | शाळेसाठी | शाळेचे भौतिक व अंतर्गत वातावरण समृद्ध करण्यासाठी. | वर्षभर उपक्रम सुरू राहावेत | शिक्षण समिती, ग्राम पंचायत, नगर पालिका | शाळेच्या आंतरक्रियांमध्ये सुधारणा अद्याप नाही. त्या दृष्टीने शिक्षक, पालक यांचेही सहकार्य अपेक्षित. |
| (८) | व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे | प्रत्येक विद्यार्थ्यासाठी इयत्तानिहाय | विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाकरिता | पहिल्या सत्रात अंतर किमान ५ दिवसाचे | शिक्षणाधिकारी (विविध शाळांच्या माध्यमातून) | इयत्तानिहाय तालुका स्तरावर होणाऱ्या शिबिरांकरिता आर्थिक तरतूद आवश्यक. |

| अनु. क्र. | कृती कार्यक्रम | कुणासाठी | कशासाठी | केव्हा | कोणाची जबाबदारी | अन्य तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| (९) | संस्कार वर्ग | शिक्षणापासून वंचित असणारे विद्यार्थी | वंचित विद्यार्थ्यांवरही सुसंस्कार व्हावेत व ते मूल्य शिक्षणाच्या प्रवाहात यावेत. | आठवड्यातून किमान ३ दिवस | शिक्षण विभाग | वेगळ्या संस्कार शिक्षकांची नेमणूक व ह्याकरिता विशेष अनुदान. |
| (१०) | मूल्य विकसन केंद्र | अपंग व मतिमंद बालक | मूल्य शिक्षणापासून वंचित असणाऱ्या अपंग व मतिमंद मुलांना या प्रवाहात आणण्यासाठी | आठवड्यातून किमान ३ दिवस | शिक्षण विभाग, समाज कल्याण विभाग राबवणूक व अनुदान | विशेष संस्कार शिक्षकाची नेमणूक व विशेष संस्थांच्या माध्यमातून |
| (११) | मूल्य शिक्षणातील धोरणात्मक अडचणींचे निवारण | प्रशासकीय अधिकारी | धोरणात्मक निर्णयांची माहिती घेणे. प्रशासकीय अडचणींचे निवारण. | दरवर्षी किमान २ दिवसांची बैठक | शिक्षण सचिव | बैठकांचे नियमित आयोजन व्हावे |
| (१२) | प्रसार माध्यम संपर्क | आकाशवाणी, वृत्तपत्र, दूरदर्शन यातील अधिकारी | मूल्य शिक्षण विकासासाठी प्रसार माध्यमांतून होणारी मूल्य विटंबना थांबविणे. | जेव्हा जेव्हा धोरणात्मक निर्णय होतील तेव्हा | शिक्षण सचिव व माहिती व प्रसार राज्यमंत्री | प्रसार माध्यमांतून शिक्षणाबाबत जी विटंबना होत आहे, ती तातडतोब थांबविणे आवश्यक आहे. |
| (१३) | पालक प्रबोधन शिबिर | सर्वच स्तरातील पालकांसाठी | पालकांचा कृतीयुक्त सहभाग | वर्षातून किमान २ वेळा तीन दिवसीय | शाळा, माध्यमिक शिक्षण विभाग, | मूल्य रुजविण्यासाठी पालक, शाळा, शिक्षक, समाज यांचा |

| अनु. क्र. | कृती कार्यक्रम | कुणासाठी | कशासाठी | केव्हा | कोणाची जबाबदारी | अन्य तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विविध सामाजिक संस्था | समन्वय असावा यासाठी शासकीय अनुदान मिळावे. |
| (१४) | शिक्षक प्रबोधिनी | शिक्षक व मुख्याध्यापक | शिक्षक व मुख्याध्यापकांच्या अध्यापकीय व्यक्तिमत्त्वाच्या परिपूर्ण विकासासाठी. | वर्षभर | शिक्षण विभाग, मुख्याध्यापक | शासनाने पुरेसे अनुदान उपलब्ध करून द्यावे. |
| (१५) | Monitoring Strategy निर्धारित करणे. | शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक | वर्षभर होणाऱ्या मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर मूल्यमापन व्हावे. | वर्षभर | शिक्षण विभाग, मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी | याकरिता मूल्यमापन केंद्रांची स्थापना प्रत्येक स्तरावर करावी. |
| (१६) | साक्षरोत्तर मूल्य शिक्षण | नवसाक्षर लोकांसाठी | पाल्याच्या विकासास हातभार लागावा म्हणून. | आठवड्यातून किमान ३ दिवस | माध्यमिक शिक्षण विभाग आणि प्रौढ शिक्षण विभाग | साक्षरोत्तर कार्यक्रमात याचा अंतर्भाव असेल पण मूल्य शिक्षण अभियानात याला प्राधान्य देण्यात यावे व याकरिता वेगळ्या अनुदानाची योजना असावी. |